# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### इनगोंदा ते मुगाव व इनगोंदा ते पारेवाडी (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१) १०४७० (२०-११-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इनगोंदा ते मुगाव व इनगोंदा ते पारेवाडी (ता.परांडा,जि.उस्मानाबाद) रस्त्याची दुरवस्था झाली असून शाळेतील विद्यार्थ्यांना पावसाळयात गुडघाभर पाण्यामधून शाळेत ये-जा करावे लागत असून स्थानिकांना दवाखान्यात जाण्याकरीता अडचण निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नादुरुस्त रस्ता दुरुस्त करण्याकरीता संबंधित विभागाला विनंती करुनही काहीच कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इनगोंदा मुगाव व इनगोंदा ते पारेवाडी रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०२-०३-२०२२) :** (१) हे, खरे आहे.

(२) व (३) सदर प्रश्नामध्ये दोन रस्त्यांचा समावेश आहे.

(अ) इनगोंदा ते मुगाव रस्ता -

सदरचा रस्ता रस्ते विकास आराखड्यानुसार ग्रामीण मार्ग क्र.३७ असून त्याची एकूण लांबी ४.२५० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरीता सन २०१९-२० मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रुपये १०.०० लक्ष आणि सन २०२०-२१ मध्ये जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत रुपये ३८.०० लक्ष, रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत रुपये १२.०० लक्ष असा एकूण रुपये ६०.०० लक्ष निधी मंजूर आहे. सदर काम जिल्हा परिषदेद्वारे पूर्ण करण्यात येत आहे.

(ब) इनगोंदा ते पारेवाडी रस्ता -

सदरचा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१२६ दर्जाचा असून त्याची एकूण लांबी ३.६० कि.मी. आहे. सदरचा रस्ता हा अपृष्ठांकित स्वरुपाचा असून गाव नकाशावर पायवाट आहे. सदर रस्ता खाजगी जमिनीतून जात असून जमिनधारकांनी स्वखुशीने जागा उपलब्ध करुन दिल्यास रस्ता करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बांधकाम कामगारांसाठी केलेल्या घरगुती वस्तूंच्या संच खरेदीमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत

**(२) १०६४९ (१३-११-२०२१) श्री.सुरेश धस, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांधकाम कामगारांना घरगुती वस्तूंचा संच देऊ नये त्याबदल्यात त्यांच्या बँक खात्यात रक्कम (डीबीटी) जमा करावी असे केंद्रीय श्रम मंत्रालयाचे आदेश असतानाही राज्यातील १० लाख नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी ८९० कोटी रुपयांची घरगुती वस्तू खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३० प्रकारची भांडी या कामगारांना देण्यासाठी प्रत्येकी ४४५ कोटी रुपयांच्या दोन अशा ८९० कोटी रुपयांच्या निविदा कामगार विभागांतर्गत असलेल्या महाराष्ट्र इमारत आणि बांधकाम कल्याण मंडळाकडून काढण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हे कंत्राट विशिष्ट पुरवठादार कंपन्यांना दिले जात असल्याचा आरोप झाल्याने तसेच मा.न्यायालयातही याप्रकरणी तक्रार दाखल झाल्याने व केंद्रीय श्रम मंत्रालयानेही राज्य कामगार विभागाला पत्र लिहून सोबत अधिसूचना पाठविल्याने या निविदा रद्द करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कामगारांना ८९० कोटींची रक्कम त्यांच्या खात्यात (डीबीटी) करण्याऐवजी निविदा काढून गैरव्यवहार करणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-०३-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०३/०६/२०१९ व दिनांक १३/०७/२०२० रोजीच्या बैठकीत नोंदित बांधकाम कामगार लाभार्थींना गृहोपयोगी वस्तू संच पुरविणेबाबत ठराव पारित करण्यात आला.

शासनाच्या दिनांक १८/०१/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये नोंदीत बांधकाम कामगार लाभार्थ्यांसाठी गृहोपयोगी वस्तू संच वितरण योजनेस मंजूरी देण्यात आली.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

सदर निविदा प्रक्रीया शासनाच्या प्रचलित नियमानुसार करण्यात आलेली आहे. परंतु अद्यापपर्यंत निविदा संबंधी पुढील कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

# मनोर गावातील (ता.जि.पालघर) वेळगाव रस्त्यावरील आंबेडकर नगरपासून म्हसकरपाडा-भोईरपाडा आणि पाटीलपाडा रस्त्यांच्या दुरूस्तीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३) १०७२५ (२८-०२-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर गावातील (ता.जि.पालघर) वेळगाव रस्त्यावरील आंबेडकर नगरपासून म्हसकरपाडा-भोईरपाडा आणि पाटीलपाडा रस्त्यांचे अंतर सुमारे २ कि.मी. असून सदर रस्त्यांचे काम १५ वर्षापूर्वी प्रधानमंत्री, ग्रामसडक योजनेतून करण्यात आले होते. सदर रस्त्यांची गत १० वर्षापासून दुरूस्ती न केल्यामुळे तीन आदिवासी पाडे आणि गृहसंकुलातील नागरिकांचा वापर असलेल्या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे याठिकाणी अपघात होऊन जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या दुरूस्तीचे काम विनाविलंब पूर्ण करण्यासंदर्भात येथील ग्रामस्थांनी तसेच मनोर ग्रामपंचायतीने मा.ग्रामविकास मंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग आदींकडे लेखी निवेदनाद्वारे व आंदोलने करून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्यांच्या दुरूस्तीचे काम न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू दुर्गम व आदिवासी बहुल गावातील रस्त्यांच्या दुरूस्तीचे काम विनाविलंब हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-०३-२०२२) :** (१) मनोर परिसरामध्ये अतिवृष्टीमुळे रस्ता खराब झालेला आहे. हे खरे आहे.

(२) अशा प्रकारचे लेखी निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेकडे मागणी केलेली आहे. हे खरे आहे.
(३) व (४) मनोर गावातील (ता.जि.पालघर) वेळगांव रस्त्यावरील आंबेडकर नगरपासून म्हसकरपाडा भोईरपाडा आणि पाटीलवाडी रस्ता, रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार ग्रामीण मार्ग ११० दर्जाचा आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी २.०० कि.मी एवढी आहे.

मनोर गावाच्या परिसरामध्ये पर्जन्याचे प्रमाण खुप जास्त असल्यामुळे रस्ता नादुरस्त झालेला आहे.

सदर रस्त्यावर सन २०२०-२१ मध्ये १५ व्या वित्त अयोगाच्या निधीमधून रुपये ५.०० लक्षचे काम मंजूर आहे. तसेच उर्वरीत रत्याचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## वर्धा जिल्ह्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालकांची नियुक्ती नियमबाहय पध्दतीने करण्यात आल्याबाबत

**(४) १०८६२ (२३-११-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालकांची नियुक्ती आपले सरकार या योजनेंतर्गत खाजगी कंपनीच्या माध्यमातून नियमबाहय पध्दतीने करण्यात आल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नियुक्ती ही नियमानुसार ५ कि.मी. अंतराच्या आतील रहिवासी असावा असे आदेश असताना संबंधित कपंनीने शासनाचे नियम डावलून २० ते ४० कि.मी. वर राहणाऱ्या परिचालकांची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नियुक्तीची योग्य चौकशी करण्याचे आदेश मा.पालकमंत्री यांनी संबंधित जिल्हा परिषदेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना देवूनही अद्‌याप कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२५-०२-२०२२)** : (१) याबाबत १५ जून, २०२१ ला स्थानिक वृत्तपत्रामध्ये बातमी प्रकाशित झाल्याचे दिसून येते.
(२), (३) व (४) • ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट २०१६ मध्ये ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात किंवा परिसरातील ग्रामोद्योजक आपले सरकार सेवा केंद्र चालक म्हणून निवडण्यात यावा अशी तरतुद आहे.
• मा.पालकमंत्री यांच्या आदेशानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे दिनांक ११/०८/२०२१ चे पत्रानुसार वर्धा जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी यांना संगणक परिचालकांच्या नियुक्ती संदर्भात चौकशीचे आदेश दिलेले होते, त्यानुसार जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी यांनी चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे सादर केला आहे.
• सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे, चौकशी दरम्यान वर्धा जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी यांच्या प्राप्त अहवालांनुसार ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ मधील तरतूदीनुसारच ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील किंवा परिसरातील ग्रामोद्योजकांची नियुक्ती केंद्र चालक म्हणून करण्यात आलेली आहे, असे दिसून येते.
• दरम्यान चौकशीअंती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,+ वर्धा यांच्या दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ च्या पत्रान्वये स्थानिक लोकप्रतिनिधींना उत्तर देखील देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मूल (जि.चंद्रपूर) पंचायत समिती अंतर्गत येरगांव ग्रामपंचायत येथील ग्रामसेवक यांनी गृह व पाणी करापोटी जमा होणारी रक्कम खर्च केल्याबाबत

**(५) १०८७२ (२३-११-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल (जि.चंद्रपूर) पंचायत समिती अंतर्गत येरगांव ग्रामपंचायत येथील ग्रामसेवक यांनी माहे जानेवारी, २०२१ ते मार्च, २०२१ पर्यंतचे गृह व पाणी करापोटी जमा होणारी रक्कम रुपये १ लाख ९० हजार ९११ बँकेत जमा न करता परस्पर खर्च केल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हा परिषदेने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) होय, या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मूल, जि.चंद्रपूर यांनी संबंधित ग्रामसेवकाची चौकशी केली असून सदर चौकशी अहवालानुसार ग्रामसेवकांने कर्तव्यात कसूर केल्याचे स्पष्ट झाल्यामुळे संबंधित ग्रामसेवकास दिनांक २६/१०/२०२१ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून निलंबित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात राष्ट्रीय आरोग्य योजनेंतर्गत कंत्राटी कर्मचारी म्हणून डॉक्टर, परिचारिका यांच्यासह तंत्रज्ञ आणि इतर कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(६) १०८७६ (२३-११-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.सुरेश धस, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.प्रसाद लाड, श्री.बाळाराम पाटील, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या पहिल्या लाटेत आरोग्य यंत्रणेवर आलेला ताण कमी करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य योजनेंतर्गत कंत्राटी कर्मचारी म्हणून डॉक्टर, परिचारिका यांच्यासह तंत्रज्ञ आणि इतर कर्मचाऱ्यांची सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये भरती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोरोनाचा प्रभाव कमी झाल्याने पनवेलच्या उपजिल्हा रुग्णालयात रूग्णांच्या सेवेसाठी अहोरात्र झटणाऱ्या १५ कंत्राटी कामगारांना तसेच अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या राज्यातील ५९६ आरोग्य सेविकांना व विविध रुग्णालयातील कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या अशा एकूण २१ हजार ३७३ कर्मचारी यांना कमी करण्यात येत असल्यामुळे त्यांच्यावर बेरोजगार होण्याची परिस्थती निर्माण झाली असून त्यांचे एक महिन्याचे मानधन थकीत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी जिल्ह्यातील ३६५ कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपी सेवेत सामावून घ्यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, भंडारा जिल्ह्यातील कोरोना योद्ध्यांना दिनांक १ एप्रिल, २०२० ते ३१ जुलै, २०२० रोजीपर्यंत सेवेत ठेवून त्यांना चार महिन्याचे वेतन न देता सेवेतून कमी करण्यात आले असून त्या सर्वांना एनआरएचएममध्ये समाविष्ट

करुन थकीत वेतन देण्यात यावे अशी मागणी जिल्हा इंटकने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याबाबत तसेच, त्यांना शासन सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१५-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

कोविड-१९ साथ रोगाची तिव्रता कमी झाल्यानंतर पनवेल उपजिल्हा रुग्णालयासह राज्यातील इतर जिल्हयात कोविड-१९ रुग्ण उपचारासाठी नेमलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार कमी करण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) भंडारा जिल्हयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना माहे एप्रिल, २०२० ते माहे जुलै, २०२० चे वेतन अदा करण्यात आले असून कोविड साथ संपल्यावर त्यांच्या कंत्राटी स्वरुपाची सेवा समाप्त करण्यात आलेल्या आहेत.

(५) कोविड उपचार केंद्रावर नियुक्त करण्यात आलेला कर्मचारी वर्ग हा निव्वळ कंत्राटी स्वरुपात तीन महिने किंवा कोविड-१९ साथीचे रुग्ण मोठ्या प्रमाणात असेपर्यंत, यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीपुरता मर्यादित होता. तसे त्यांच्या नियुक्ती आदेशामध्ये नमूद करण्यात आलेले होते. कोविड-१९ साथीचे रुग्ण कमी झाल्यानंतर त्यांना कमी करण्यात आले. सदर नियुक्ती तात्पुरती कंत्राटी पध्दतीची असल्याने कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

# आर्वी (जि.वर्धा) तालुक्यात जलसंपदा विभागात अनुकंपाधारकांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(७) १०८७८ (१३-११-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) तालुक्यात जलसंपदा विभागात गत १५ वर्षापासून २० पेक्षा अधिक अनुकंपा धारकांची यादी प्रतिक्षेत असून त्यांचे वयोमान ४५ वर्षे होत असल्याने त्यांना नियुक्तीपत्र देण्याबाबत अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर यांना अनुकंपाधारक संघटनेव्दारे निवेदन दिल्याचे दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर अनुकंपाधारकांना सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१६-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

अशाप्रकारचे कोणतेही निवेदन अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर यांना प्राप्त झाले नसून आर्वी (जि.वर्धा) तालुक्यात जलसंपदा विभागाच्या अधिनस्त कार्यालयात एकूण ८ अनुकंपा धारक प्रतिक्षासूचीवर असून त्यांचे वयोमान सध्या २७-३५ वर्षादरम्यान आहे. त्यानुसार उक्त ८ उमेदवारापैकी कोणत्याही उमेदवाराचे वय ४५ वर्ष होत नाही.

(२) सामान्य प्रशासन विभागाच्या प्रचलित धोरणानुसार अनुकंपाधारकांना सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

## सुकळी-दौलतपूर (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) रस्त्यावरील पुल खचला असल्याबाबत

**(८) १०८८३ (०६-१२-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकळी-दौलतपूर (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) रस्त्यावरील पूल खचला असल्याने सदर परिरातील शेतकरी व विद्यार्थ्यांना जाण्या-येण्यास त्रास होत असल्याचे दिनांक ०२/०९/२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार सदर पुलाचे बांधकाम लवकरात लवकर करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-०३-२०२२) :** (१) होय.

(२) सुकळी ते दौलतपूर रस्त्यावर सा.क्र.११/८८५ वर पूर्वी ३ Row चे सी.डी.वर्क होते. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे सी.डी.वर्कचे ॲप्रोचेस वाहून गेल्यामुळे दोन्ही गावाला होणाऱ्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. सदर पुलाची तात्पुरत्या स्वरुपाची दुरुस्ती करण्यात आली असून वाहतूक सुरळीतपणे सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रामटेक (जि.नागपूर) येथील पंचायत समितीसाठी नवी इमारत उभारण्याबाबत

**(९) ११०६० (२३-११-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) येथील पंचायत समितीची इमारत जुनी व जीर्ण झाली असून इमारतीला तडे गेल्यामुळे पावसाळ्यात गळती होत असल्याने येथील कर्मचारी जीव मुठीत घेऊन काम करत असल्याचे दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून तेथील महत्वाच्या कागदपत्रांना क्षती पोहचण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने निधीची तरतूद करुन तेथे पंचायत समितीसाठी नवीन इमारत उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) पंचायत समिती रामटेकसाठी नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकामासाठी सन २०१५-१६ च्या दरसूचीवर अधारीत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता, तथापि, अद्ययावत दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यता घेण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरू आहे. अद्ययावत दरसूचीवर अधारीत प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यावर त्यानुसार पुढील कार्यवाही करणेत येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सेवानिवृत्त आंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना देय असलेली रक्कम मिळण्याबाबत

**(१०) ११११८ (०२-१२-२०२१) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना ६५ वर्षाच्या सेवानिवृत्तीनंतर अनुक्रमे रुपये एक लाख व रूपये ७५ हजार मिळतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सन २०१४ पासून सेवानिवृत्त झालेल्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना सदर रक्कम मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सेवानिवृत्त अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना व्याजासकट देय असलेली रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१६-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दिनांक ३०/०४/२०१४ अन्वये अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका या मानधनी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती/राजीनामा/मुत्यृ/सेवेतून काढून टाकल्यानंतर एल.आय.सी मार्फ़त एकरकमी लाभ देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत सेवानिवृत्तीनंतर अंगणवाडी सेविकांना रुपये १ लाख व मिनी अंगणवाडी सेविका/ मदतनीस यांना रुपये ७५ हजार एवढा एकरकमी लाभ देण्यात येतो.
(२), (३) व (४) सदर योजनेंतर्गत आतापर्यंत १३२७८ लाभार्थ्यांना एकरकमी योजनेचा लाभ देण्यात आला असून उर्वरित प्राप्त प्रस्तावांबाबत निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

## रत्नागिरी जिल्ह्याकरीता बृहत आराखडा तयार करण्याबाबत

**(११) ११९८७ (२३-११-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दीत सुमारे ३०० चौ.मीटर (३२०० चौ.फुट) क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडावरील बांधकामांना नगररचनाकाराच्या परवानगीची गरज लागणार नसल्याची घोषणा मा.ग्रामविकास मंत्री यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जागेची मालकी कागदपत्रे, मोजणी नकाशा व इमारत आराखडा हे सर्व एकात्मिक विकास नियंत्रण नियमावलीनुसार असल्यास आणि परवानाधारक अभियंत्यांचे प्रमाणपत्रानंतर ग्रामपंचायतस्तरावर घर बांधण्याची परवानगी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय बृहत आराखडा (रिजनल प्लॅन) न झाल्याने रत्नागिरी जिल्ह्याला यातून वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रत्नागिरी जिल्ह्याकरीता बृहत आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-०३-२०२२) :** (१) होय.
(२) शासन पत्र क्र.व्हीपीएम २०२१/प्र.क्र.६५/पंरा-४,दिनांक १८ मार्च,२०२१ च्या पत्रान्वये ग्रामीण क्षेत्रातील इमारत बांधकाम परवानगीबाबत सविस्तर सुचना देण्यात आल्या आहेत.
(३) होय.
(४) नगरविकास विभागाने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० अन्वये रत्नागिरी-सिंधुदुर्ग प्रादेशिक योजना क्षेत्रातील नियोजन प्राधिकरण नसलेल्या ग्रामपंचायतींना त्यांच्या क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात आले असून, सदर अधिसूचनेतील अटी व शर्तीस अधिन राहून या ग्रामपंचायतींना बांधकाम परवानगीचे अधिकार देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन स्थळांवर असलेल्या सागरी जीवरक्षकांच्या मागण्यांबाबत

**(१२) ११२०० (२३-११-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा परिषद, ग्रामपंचायत अंतर्गत अनेक पर्यटन स्थळे येत असून समुद्र ठिकाणी असलेल्या पर्यटन स्थळांवर असलेले सागरी जीवरक्षक स्वत:चा जीव धोक्यात घालून पर्यटकांचा जीव वाचवतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीवरक्षकांना तात्पुरत्या स्वरूपात राबविण्यात येत असल्यामुळे अपघातावेळी त्यांच्या जीवितास हानी झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना कोणतीच मदत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जीवरक्षकांची वेतनवाढ करून त्यांचा विमा उतरविण्यात यावा, जीवितहानी झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदतीची तरतूद करावी, पर्यटन स्थळावर काम करण्यासाठी योग्य ते साहित्य पुरविण्यात यावे अशी मागणी नगरविकास मंत्र्यांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने जीवरक्षकांबाबत कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०७-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) प्रश्नातील नमूद मागणी संदर्भात केलेले निवेदन/पत्र मा.मंत्री, नगरविकास यांच्या कार्यालयामधील अभिलेख तपासले असता आढळून आलेले नाही.
(४) विभागाच्या दिनांक ०३ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रत्नागिरी, पालघर, रायगड व सिंधुदुर्ग या ४ जिल्ह्यातील एकूण ३८ समुद्रकिनाऱ्यावरील प्रत्येकी २ जीवरक्षकांना (एकूण ७६ जीवरक्षक) प्रती जीवरक्षक रूपये ६०००/- इतके मानधन एक विशेष बाब म्हणून एकूण रुपये ५४,७२,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये एप्रिल, २०१८ वर्षापासून संबंधित ग्रामंपचायतींनी जीवरक्षक मानधनासाठी स्वउत्पन्नातुन तरतुद करावी असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शासनाकडून एप्रिल, २०१८ पासून जीव रक्षकांना मानधन अदा करण्यात आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) ११२०९ (१३-११-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गडचिरोली, सोलापूर व मुंबई अशा शहरात झोपडपट्टी व गजबजलेल्या ठिकाणी व ग्रामीण भागात वैद्यकीय अभ्यासक्रमाची कोणतीही पदवी नसलेले डॉक्टर कार्यरत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही दिवसांपूर्वी गोवंडी येथे झालेल्या कारवाईनंतर पोलिसांनी घाटकोपरच्या रमाबाई कॉलनीमधील काही क्लिनिकवर छापे टाकून यात कोणतीही पदवी नसलेल्या व प्रशिक्षणाशिवाय रुग्णांवर उपचार करणाऱ्या तीन डॉक्टरांना पोलिसांनी अटक केल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सोलापूर शहरातील जय रुग्णालयामध्ये मागील ६ महिन्यांपासून बोगस डॉक्टरांकडून उपचार केले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बोगस डॉक्टर हे कोणताही वैद्यकीय परवाना नसताना राज्यात शहरी व ग्रामीण भागात क्लिनिक उघडून नागरिकांच्या जीवाशी खेळत असून अशा बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यासाठी तालुका व जिल्हास्तरावर समित्या असूनही या समित्यांद्वारे सदर डॉक्टरांवर कोणतीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांची फसवणूक करणाऱ्या वैद्यकीय शिक्षण न घेतलेल्या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१६-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) नाही.
(५) होय, गडचिरोली मधील ३, सोलापूर मधील ३ व मुंबई मधील ९ बोगस वैद्यकीय व्यवसायिकांविरुध्द पोलिसांकडून संबंधित पोलीस ठाण्यामध्ये भारतीय दंड विधान कलम ४१९, ४२०, ४६८, ४७१ सह महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३३, ३४, ३६, ३८ अन्वये प्रकरण परत्वे लागू कलमानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे व सदर प्रकरणाचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

तसेच बोगस वैद्यकीय व्यावसायिकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिनांक १५/१२/२०२१ अन्वये सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील गोसीखुर्द प्रकल्पातुन होणाऱ्या पाण्याच्या विसर्गामुळे गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात निर्माण होणाऱ्या पुर परिस्थितीबाबत

**(१४) ११२६९ (१३-११-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील गोसीखुर्द प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात होणाऱ्या पाण्याच्या विसर्गामुळे आजूबाजूच्या परिसरामध्ये पुर परिस्थिती निर्माण झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोसीखुर्द प्रकल्पामध्ये दहा प्रकल्प व चार नद्यांचे पाणी समाविष्ट असून प्रकल्पातुन होणाऱ्या पाण्याच्या विसर्गामुळे गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात निर्माण होणाऱ्या पुर परिस्थितीचा अभ्यास करुन उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने वारंवार होणाऱ्या पुर परिस्थीतीचा अभ्यास करुन होणाऱ्या पाण्याच्या विसर्गाबाबत उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०२-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भंडारा जिल्हा परिषदेतील कनिष्ठ व स्थापत्य अभियंता संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१५) ११२७३ (२३-११-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हा परिषदेतील कनिष्ठ व स्थापत्य अभियंता संवर्गातील अनेक रिक्त पदांमुळे जिल्हा परिषदेच्या विकास कामात अडचणी येत असल्याने सदरहू रिक्त पदे भरण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा परिषदेतील कनिष्ठ व स्थापत्य अभियंता संवर्गातील अनेक रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०८-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामविकास विभागाने सर्व जिल्हा परिषदांमधील गट “क” संवर्गातील एकूण १८ संवर्गातील पदभरतीसाठीची जाहिरात माहे मार्च, २०१९ मध्ये प्रसिध्द केली आहे. तथापि, सद्य:स्थितीत कोरोनाच्या पार्श्वभुमीवर केवळ आरोग्य विभागाशी संबंधित पदभरतीसाठी वित्त विभागाची मान्यता प्राप्त

झाली आहे. जिल्हा परिषदेतील कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियंता संवर्गासह इतर उर्वरित संवर्गाच्या पदभरतीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे. अद्याप वित्त विभागाची मान्यता अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अमरनाथ यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरुंना अनुदान मिळण्याबाबत

**(१६) ११३२५ (१५-११-२०२१) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दरवर्षी अमरनाथ यात्रेसाठी अनेक भाविक तीर्थयात्रेसाठी जात असून या यात्रेकरुंना हज यात्रेप्रमाणे अनुदान मिळण्याबाबत मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरनाथ यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरुंना हज यात्रेप्रमाणे अनुदान मिळण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०३-०३-२०२२) :** (१) या विभागास अशी मागणी प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरेगाव (जि.सातारा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय खाजगी संस्थेला चालविण्यास दिल्याबाबत

**(१७) ११३५७ (०२-१२-२०२१) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरेगाव (जि.सातारा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालय जिल्हाधिकारी, सातारा यांनी खाजगी संस्थेला कोरोना रुग्णालय म्हणून दिनांक २२ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास करार करुन चालविण्यास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयासाठी अपेक्षित असलेले वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व इतर कर्मचारी यांची करारानूसार नियुक्ती करण्यात आली नसून सदर रुग्णालयात अनियमितता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, कोरोना रुग्णांना जिल्हाधिकाऱ्यांकडून पूरवठा करण्यात येणारे रेमडेसिव्हीर इंजेक्शन काळाबाजारात विकले जात असून तेथील रुग्णांना औषधे रुग्णालयातून न देता एका ठराविक मेडिकल स्टोअरमधून घेण्याचा आग्रह केला जात असल्याच्या लेखी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१६-०३-२०२२) :** (१), (२) व (३) कोरेगाव (जि.सातारा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयास जिल्हाधिकारी, सातारा यांच्या सूचनेनुसार दिनांक २२/०४/२०२१ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सातारा यांनी खाजगी संस्थेशी करार करुन कोविड-१९ सेंटर चालवण्यास दिले.

सदर करारनाम्याप्रमाणे रुग्णालयासाठी अपेक्षित असलेले वैद्यकीय अधिकारी परिचारिका व इतर कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी सातारा यांच्याकडून इंजेक्शन रेमडेसिव्हिर १०० एम.जी. एकूण १८२ व्हायलचा पुरवठा "काडसिद्धेश्वर कोविड-१९ सेंटर, कोरेगांव" यांना करण्यात आला होता. सदरच्या सर्वच्या सर्व १८२ व्हायलचा वापर ९२ कोविड रुग्णांसाठी करण्यात आला. तसेच रेमडेसिव्हिर इंजेक्शन काळ्याबाजारात विकले जात असल्याबाबत व रुग्णांना औषधे रुग्णालयातून न देता एका ठराविक मेडिकल स्टोअरमधून घेण्याचा आग्रह केला जात असल्याबाबत लेखी तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे भांडेवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(१८) ११३६७ (१५-११-२०२१) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भांडेवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील गट क्रमांक ४०९ मधील १४७ लोकांनी सन १९४० पासून घरांची बांधकामे केलेली असून ग्रामविकास विभाग शासन निर्णय प्रआयो-२०१७/ प्र क्र. ३४८ /योजना-१०, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ नुसार सदर बांधकामे नियमाकुल करण्यासाठी ग्रामपंचायत भांडेवाडीने दिनांक १८ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, सातारा, प्रांत अधिकारी, दहिवडी यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत भांडेवाडीने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित स्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१४-०३-२०२२) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

ग्रामपंचायत भांडेवाडी यांनी आपल्या गावातील कार्यक्षेत्रातील निवासी प्रयोजनार्थ १३७ अतिक्रमणे नियमाकुल करणेसंदर्भात शासन परिपत्रक दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ नुसार कार्यवाही करून जिल्हाधिकारी सातारा, प्रांत अधिकारी, दहिवडी यांच्याकडे दिनांक १८ जून, २०१९ रोजी प्रस्ताव सादर केला आहे.

(२) ग्रामपंचायत भांडेवाडीने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(३) जिल्हाधिकारी, सातारा यांचे निर्णयास अधीन राहून अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेची दक्षता ग्रामपंचायत भांडेवाडी, ता.खटाव, जि.सातारा घेत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील दुधनवाडी, देऊर, बिचकुले, नलवडेवाडी रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत

**(१९) ११३६८ (१३-११-२०२१) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील दुधनवाडी, देऊर, बिचकुले, नलवडेवाडी (ता.कोरेगांव) रस्ता (इजिमा-२३ (०/०० ते १२/००)) मेडाअंतर्गत मंजूर असून रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रुपये ३०२.३ लक्ष इतक्या रकमेची शासनाने मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर खाजगी इसमाने अतिक्रमण करुन घर बांधले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत जिल्हाधिकारी सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सातारा व प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांचेकडे तेथील नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रारी करुनही अद्याप अतिक्रमण काढण्याची कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-०३-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सातारा जिल्ह्यातील दुधनवाडी देऊर, बिचकुले, नलवडेवाडी रस्ता ता.कोरेगांव हा रस्ता इजिमा क्र. ७१ आहे.

सदर रस्त्याची एकूण लांबी १३/८०० कि.मी. इतकी असून सदर लांबीतील सा.क्र.९/०० ते १२/०० या साखळी क्रमांकातील रस्त्यांच्या मंजूरीनुसार काम करताना तेथील रस्त्याच्या कडेला खाजगी इसमाने घर बांधले असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग, कोरेगोव यांचेकडून रस्त्याची मोजणी करुन हद्दी कायम करणेबाबत भूमी अभिलेख, कार्यालय कोरेगांव यांना कळविण्यांत आले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सारूळ येथे सभागृह उभारणीसाठी रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठान देवगाव (ता.केज, जि.बीड) यांना मंजूर झालेल्या निधीबाबत

**(२०) ११४६८ (१५-११-२०२१) श्री.विनायकराव मेटे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक ५७८७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सारूळ येथे सभागृह उभारणीसाठी खासदार फंडातुन रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठान देवगाव (ता.केज, जि.बीड) यांना रुपये १८ लाखाचा निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विडा येथील पंचायत समिती सदस्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी कार्यकारी अभियंता, बीड यांना उपरोक्त रुपये १८ लाखाचा निधी वसुल करण्याची नोटीस दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने दिलेला निधी वसुल करण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०७-०३-२०२२) :** (१) खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मौ. सारोळा येथे रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठान, देवगाव (ता.केज, जि.बीड) या संस्थेच्या मालकीच्या जागेवर सामाजिक सभागृह बांधणेसाठी जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ०४/०६/२०१८ अन्वये रुपये २४.९५ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिली असून दिनांक २१/०१/२०२० च्या आदेशान्वये या कामासाठी कार्यान्वयीन यंत्रणा कार्यकारी

अभियंता, बांधकाम विभाग क्र.२, जिल्हा परिषद, बीड यांना रुपये १८.७१२५ लक्ष इतका निधी वितरीत केला आहे.

(२) होय. याबाबत पंचायत समिती सदस्य, केज यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी नोटीस दिली आहे.

(३) अ) सदर प्रकरणी सभागृहाचे बांधकाम हे नियोजित जागे व्यतिरीक्त संस्थेच्याच मालकीच्या अन्य जागेवर सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता न घेता करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सभागृह प्रत्यक्षात ज्या जागेवर बांधण्यात आलेले आहे, त्या रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठान, देवगाव (ता.केज, जि.बीड) यांच्या धावज्याची वाडी, ता.जि.बीड येथील सर्वे क्र. १५५ मधील जागेवर रुपये १८,४३,१८१/- इतक्या रकमेचा बोजा चढविण्यात आला आहे.

ब) जिल्हा परिषद (सार्व.बांधकाम) उपविभाग, केज येथील श्री.बी.बी. खेडकर, उपअभियंता यांची १ वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात १ वर्षाकरीता स्थगित करण्यात आली आहे.

क) सदर प्रकरणी सभागृहाच्या बांधकामाची प्रशासकीय मान्यता प्राप्त नियोजित जागा व प्रत्यक्ष बांधकाम करण्यात आलेली जागा यात तफावत असल्याने केंद्र शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या खासदार स्थानिक क्षेत्र विकास निधी संदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे पालन झालेले नाही. त्यामुळे केंद्र शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालयाकडून प्रस्तुत प्रकरणी मार्गदर्शन घेणेबाबत शासन स्तरावरुन जिल्हाधिकारी, बीड यांना दिनांक ०३/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.